# प्रकरण पाचवे

# ना. ग. गोरे यांचे राजकीय विचार

## प्रकरण ५ वे

# ना. ग. गोरे यांचे राजकीय विचार

<u>प्रस्तावना</u> -

ना. ग. गोरे हे सामाजिक व आर्थिक समतेचे पुरस्कर्ते होते. भारतात सामाजिक समतेला अग्रस्थान दिले पाहिजे. समाजवादी विचारांना सामाजिक समतेचे अधिष्ठान असले पाहिजे, अशी त्यांची भूमिका होती. ना. ग. गोरे हे राजकीय आघाडीचे नेते होते. त्यांची समाजवादावर निष्ठा होती. त्यांचे राजकीय विचार तर्कनिष्ठ होते. प्रस्तुत प्रकरणात ना. ग. गोरेंच्या राजकीय विचारांचा परामर्श घेतला जाणार आहे.

**राजकीय विचार :-**

ना. ग. गोरे यांची पाच दशकांची वाटचाल म्हणजे राजकीय उत्क्रांतीच होय. त्या वाटचालीत ना. ग. गोरेंचे व्यक्तिमत्व कधी युवक आंदोलनातून बहरले तर कधी भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामात त्यांची अग्निपरीक्षा झाली. आपल्या राजकीय बांधिलकीसाठी त्यांनी तुरूंगवास भोगला. त्याचप्रमाणे जनता राजवटीत भारताचे राजदूत म्हणून लंडनमध्ये वास्तव्य करताना अधिकारपदाने ते कधी हुरळूनही गेले नाहीत. संघर्षाविरूद्ध आवाज उठविणारे, परिवर्तनवादी विचारांचे, समतेचे ध्येय सतत बाळगणारे आणि आपल्या विज्ञाननिष्ठ आणि बुध्दिप्रामाण्यवादी दृष्टीमुळे अंधश्रध्देविरूध्द सदैव उभे ठाकणारे ना. ग. गोरेंचे व्यक्तिमत्व एक आगळे व्यक्तिमत्व होय. ना. ग. गोरेंच्या राजकीय वाटचालीतून त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या ह्या विविध पैलूंचे दर्शन घडते.

विद्यार्थीदशेत पुणे येथे फर्ग्युसन कॉलेजमध्ये इंग्रजी साहित्याचे अध्ययन करीत असताना ना. ग. गोरेंचे तात्त्विक चिंतन आणि मनन सुरू झाले. परंतु शिक्षण घेत असताना त्यांनी प्रत्यक्ष राजकारणात भाग घेतला नाही. कॉलेजच्या मासिकामध्ये त्यांनी इंग्रजी लिखाण सुरू केले. ना. ग. गोरेंनी ललित लेखनाची सुरूवात कॉलेजमध्ये असतानाच केली. आपल्या भावी राजकीय जीवनाची वैचारिक साधन सामग्री त्यांनी विदयार्थी जीवनात गोळा केली.

युसूफ मेहरअली हयांनी सुरू केलेल्या यूथ लीगशी ना. ग. गोरेंचा संपर्क आला. एका अर्थाने आपल्या राजकीय जीवनाचा पाया त्यांनी हया युवक आंदोलनाद्वारे उभारला. ना. ग. गोरेंनी आपल्या तत्त्वांशी कधी तडजोड केली नाही. ना. ग. गोरेंसारख्या लढाऊ समाजवाद्यांना केवळ वैयक्तिक सत्याग्रहाची कृती विशेष पसंत नव्हती. त्याऐवजी व्यापक जनआंदोलन सुरू करावे असा त्यांचा आग्रह होता. परंतु ना. ग. गोरेंची लढाऊ भूमिकेस वास्तववादाचीही साथ होती, आणि म्हणूनच त्यांची धारणा होती की वैयक्तिक सत्याग्रह मोठया प्रमाणावर झाला की, त्यातून व्यापक संघर्षास अनुकूल भूमि तयार होईल. लोकांच्यात सामुहिक सत्याग्रहाची वृत्ती वाढत जाईल. याच कारणास्तव समाजवाद्यांनी वैयक्तिक सत्याग्रहाला आपला पाठिंबा दिला होता.

ना. ग. गोरेंनी राजकारण आणि समाजकारण हयांची फारकत कधी केली नाही. आधी राजकीय सुधारणा की आधी सामाजिक सुधारणा हया प्रश्नावर लोकमान्य टिळक आणि सुधारक आगरकर हयाच्यामध्ये मोठा संघर्ष झाला होता. परंतु ना. ग. गोरेंच्या मनामध्ये मात्र हया संघर्षाने कधीही घर केले नाही. राजकीय स्वातंत्र्याशिवाय सामाजिक सुधारणेस सामर्थ्य प्राप्त होणार नाही. आणि सामाजिक

BA... ...IVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

सुधारणेविना राजकीय स्वातंत्र्यासही आशय प्राप्त होणार नाही. ही ना. ग. गोरेंच्या राजकीय वाटचालीतील श्रध्दा होती. ना. ग. गोरे हे समाजवादी आहेत. परंतु खऱ्या अर्थाने ते सत्याशोधक समाजवादी होते. ना. ग. गोरेंचा राजकीय आणि सामाजिक पिंड हा मार्क्स, गांधी, फुले आणि आंबेडकर हयांच्या रसायनाने बनलेला होता. ना. ग. गोरेंनी आपल्या राजकीय वाटचालीमध्ये परिवर्तन आणि स्थिरता हयांचा मिलाफ म्हणजे लोकशाही क्रांती हे सातत्याने मान्य केले आहे. परिवर्तनविरोधी आणि स्थिरता हयांचा संगम म्हणजे यथास्थितिवाद परिवर्तन विरोध आणि स्थिरता यांची सांगड म्हणजे अराजकवाद हयाच कारणास्तव ना. ग. गोरेंना अभिप्रेत असलेल्या लोकशाही क्रांतीमध्ये स्थिरता आणि परिवर्तनशीलता हयांच्या पूरकतेवर भर दिला आहे. भारताची लोकशाही घटना भारतीय घटनासमितीने मंजूर केली तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या समारोपाच्या भाषणात इशारा देऊन ठेवला की, ''घटनासमितीने राजकीय लोकशाही निर्माण केली खरी'' परंतू त्याचबरोबर समाजात सामाजिक आणि आर्थिक विषमताही अस्तित्वात आहे. या दोहोतील आंतर्विरोध नष्ट झाला नाही तर विषमतेखाली दबलेली जनताच घटनासमितीने मोठ्या प्रयासाने उभा केलेला राजकीय लोकशाहीचा डोलारा उध्वस्त करील'' डॉ. आंबेडकरांनी दिलेल्या धोक्याच्या हया इशाऱ्याची सदैव जाणीव राखणाऱ्यांमध्ये ना. ग. गोरे अग्रेसर होते. १

ना. ग. गोरे हे १९३०, १९३२ आणि १९४२ या तीन स्वातंत्र्य आंदोलनामध्ये सहभागी झाले. स्वातंत्र्य आंदोलनामध्ये समाजातील सर्व स्तरातील लोकांना एकत्रित करण्याचे काम त्यांनी केले. गांधीजींच्या सत्याग्रहाच्या मार्गाचा अवलंब केला. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी तुरूंगवास सोसला. गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचा त्यांनी पुरस्कार केला. स्वातंत्र्यलढयाच्या संग्रामात त्यांना भाग घेता आला हयाचे

ते भाग्य मानतात.

भारतीय स्वतंत्र्यलढा व्यापक आणि समाजातील सर्व जातिधर्मांच्या लोकांना सामावून घेण्याच्या भूमिकेवरूनच चालविला पाहिजे असे त्यांचे मत होते. राजकीय स्वातंत्र्यासाठी चळवळ करताना आपण आपल्या समाजातील दोषही दूर केले पाहिजेत आणि अस्पृश्यतेचे निर्मूलन केले पाहिजे, या गांधीजींच्या भूमिकेला ना. ग. गोरेंनी पाठिंबा दिला. त्यांचे विचार सर्वच बाबतीत पुरोगामी होते. लोकमान्य टिळकांचा जहाल राष्ट्रवाद आणि आगरकरांची समाजसुधारणावादी भूमिका या दोन्ही प्रवृत्ती एकत्र असल्या पाहिजेत असे त्यांना वाटत होते. या वैचारिक भूमिकेवरूनच त्यांनी 'यूथ लीगची' स्थापना केली.

ना. ग. गोरे हे समाजवादी विचारांचे नेते होते. भारतातील स्वातंत्र्य चळवळीत समाजवादी आशय आणण्यासाठी जी संघटना उभी करावी लागेल आणि जे आंदोलन करावे लागेल त्याची सर्व सूत्रे भारतींच्याच हाती असली पाहिजेत अशी त्यांची भूमिका होती. भारताचे स्वातंत्र्य हे शेतकरी आणि कामगारांसाठीच असले पाहिजे आणि त्यासाठी स्वातंत्र्य चळवळीला समाजवादी विचारांची व चळवळीची जोड दिली पाहिजे, असे त्यांचे मत होते. राजकारण हे बुध्दिप्रामाण्यवादी भूमिकेवर आधारलेले असले पाहिजे असा त्यांचा दृष्टिकोण होता.२

ना. ग. गोरेंना सार्वजनिक आणि खाजगी जीवनात अनेक कसोटीच्या प्रसंगातून जावं लागलं. ना. ग. गोरे आयुष्यभर राजकारणाच्या क्षेत्रात राहिले असले तरी जिंकण्यासाठी प्रतिपक्षाची मत खोडून काढताना कोणाचीही निंदा केली नाही. सभ्यता आणि सुजनता न सोडता कणखरपणाने विरोधकांचे मुद्दे खोडून काढण्याचा गोपाळ कृष्ण गोखले आणि म. गांधी यांचा आदर्श त्यांना अधिक महत्वाचा वाटला.

स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातही अन्यायाविरूद्ध करावयाच्या झगड्यात ना. ग. गोरेंचे पाऊल कधीही मागे पडले नाही. राजकीय क्षेत्रात त्यांनी सार्वजनिक कार्यांना महत्व दिले. त्याबरोबरच कुठल्याही एका व्यक्तीला संपूर्णपणे शरण जाऊन ते तिचे भगत झाले नाहीत. त्यांनी विचार पारखून त्यांचा स्वीकार केला. जे विचार पटले नाहीत तर व्यक्ती थोर आहे म्हणून भिडेस्तव स्वीकारले नाहीत. हे बुध्दिनिष्ठ सुसंस्कृततेचे लक्षण आहे.

ना. ग. गोरेंनी स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात भरपूर तुरूंगवास भोगला. भारत स्वतंत्र होऊन सहा वर्षे झाली तरी गोव्यावर पोर्तुगीजांचे राज्य होते. गोवा पारंतंत्र्यात आहे. याची ना. ग. गोरेंना खंत वाटत असे. गोवा स्वतंत्र करण्यासाठी भारतीय जनतेने पुढाकार घेतला पाहिजे. असे त्यांचे मत होते. डॉ. लोहियांनी गोव्यात जाऊन प्रथम सत्याग्रह केला. पण गोवामुक्ती सत्याग्रहात सर्व देशाने भाग घ्यावा हा विचार प्रामुख्याने ना. ग. गोरेंनी मांडला व नंतरच गोवा सत्याग्रहाला व्यापक स्वरूप आले. गोवामुक्तीसाठी गोव्यातील वा गोव्याबाहेरील गोवेकरांनीच फक्त सत्याग्रह करायचा ? गोवा हा आपल्या देशाच्या हिस्सा आहे त्यामुळे त्यांच्या मदतीला सर्वांनी गेले पाहिजे असे ना. ग. गारेंचे मत होते. आपल्या विचाराप्रमाणे त्यांनी सत्याग्रहाची कृती अंमलात आणली. त्यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी गोव्यात सत्याग्रहींची तुकडी नेली. व त्यांना दहा वर्षांची शिक्षा झाली. स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्योत्तर काळातही ना. ग. गोरेंनी महात्मा गांधीजींच्या सत्याग्रह या तत्त्वाचा विचार केला.

लोकसत्ता आणि समाजवाद ह्या ध्येयांशी ना. ग. गोरेंनी सदैव इमान राखले आणि वित्तहानी, शक्तिहानी आणि मानहानी पत्करून भारतामध्ये पुरोगामी विरोधी

पक्षाच्या पायाभरणीचे कार्य केले. आपला देश स्वभावत: मूर्तिपूजक आहे. त्यामुळे त्यांनी स्वत:ची 'देऱ्हाऱ्यात पूजा करण्याची मूर्ती' होऊ दिली नाही. ना. ग. गोरे योग्य तेच बोलले. नेहरूंच्या धोरणावर तर्काला धरून त्यांनी विरोध केला. त्या काळात 'होय आम्ही नेहरू मंत्रिमंडळाचा राजीनामा मागतो,' हा लेख ना. ग. गोरेंनी 'साधनेत' लिहला होता. आंधळेपणाने एखादया माणसाची देव्हाऱ्यात स्थापना करून तोच कर्ताकरविता आहे असे मानून चालण्याच्या प्रवृत्ती मुळेच आपला समाज जडशीळ झालेला आहे असे त्यांचे मत होते. त्यांचा नेहरूंना विरोधासाठी विरोध नव्हता. उलट नेहरूविषयी त्यांना विलक्षण आकर्षण होतं. राष्ट्रीय चळवळीत पडलेल्या तरूणांना नेहरूंच्या विज्ञाननिष्ठेतल्या आधुनिकतेचं आणि साहित्य आणि इतर कलांच्या जोपासनेच्या आस्थेचं विलक्षण कौतूक होते. ना. ग. गोरें लोकशाही समाजवादावर डोळस निष्ठा ठेवून राजकारणाच्या आखाडयात उतरले ना. ग. गोरेंना राष्ट्रहिताच्या दृष्टीने जे योग्य वाटले त्याचा त्यांनी पाठपुरावा केला. त्यात कुणाचाही मुलाहिजा ठेवला नाही. मग ते मत नेहरूविरूद्ध असो, जयप्रकाशांविरूद्ध असो की लोहियांविरूद्ध असो. मात्र हा विरोध प्रकट करताना, त्यांच्या मतांच्या प्रामाणिकपणाविषयी त्यांना शंका नसे. ३

ना. ग. गोरेंचा 'होय, आम्ही नेहरू मंत्रिमंडळाचा राजीनामा मागतो' हा लेख साधना साप्ताहिकांत प्रसिध्द झाल्यानंतर त्यावर बरेच टीकात्मक लिखाण झाले. ना. ग. गोरेंच्या मते, भारतासारख्या देशांत विरोधी पक्ष वाढवणे हे फार जिकीरीचे व मुदतीचे काम आहे, हे ज्या टीकाकारांनी येथील स्वातंत्र्याचा इतिहास वाचला असेल त्यांना समजू शकेल. ना. ग. गोरेंच्या मते, नेहरू मंत्रिमंडळाने आपल्या अधिकाराचा त्याग केल्यास राजकारण एका वेगळयाच पातळीवर जाईल. देशाच्या राजकारणाची, अर्थकारणाची व समाजकारणाची वेगळी घडी बसवता यावी म्हणून नेहरू मंत्रिमंडळाने

आपण अधिकार त्याग करीत असल्याचे जाहीर केल्यास काँग्रेसचा आश्रय घेऊन जनतेच्या भोळ्यापणाचा फायदा घेणारे संधिसाधु आपापल्या स्थानी परततील. त्यामुळे विरोधी पक्षही जागे होतील. या प्रक्रियेमधून नव्या दमाचे अधिक शिस्तीचे व कडवे सरकार निर्माण होईल. पंतप्रधानांच्या म्हणण्याप्रमाणे कार्यक्रम व तेवढीच धोरणे हा प्रकार बंद व्हावयास पाहिजे. त्याबाबत स्पष्टपणे आपल्या अंत:करणांतील राग व्यक्त करण्याची जनतेने तयारी केल्याशिवाय भारतात काँग्रेसने चालवलेल्या मनमानी कारभाराला आळा घालता येणार नाही. हे नेहरू मंत्रिमंडळाकडे राजीनाम्याची मागणी करण्यामध्ये ना. ग. गोरे यांचे उद्दिष्ट होते. त्यांच्या मते, भारतीय समाज गेली शेकडो वर्षे स्थिर राहिला, एखाद्या प्रचंड शिळेप्रमाणे अविचल अपरिवर्तनीय बनून राहिला म्हणून तर तो ऐक्यहीन, तेजोहीन, ज्ञानहीन बनलेला आहे. म्हणून प्रजासमाजवादी पक्षाची मागणी समाजातील जडता घालवण्यासाठी असून त्यांचे स्थैर्य बिघडवण्यासाठी केलेली नाही हे समजून घेण्याची आवश्यकता आहे. असा परखड विचार त्यांनी त्यावेळी मांडला व टीकाकारांची मते खोडून काढली. ४

ना. ग. गोरेंनी सार्वजनिक जीवनात समर्पणाच्या भावनेने प्रवेश केला होता. जीवनात नाना प्रकारचे आघात केले. राजकारणापासून आपल्याला फायदा कसा मिळेल याचा विचार न करता त्यांनी आपले कार्य चालू ठेवले. प्रखर टीकेच्या भडीमारातून जाताना त्यांनी कधीही टोकांचा निर्णय घेतला नाही. ना. ग. गोरेंना राजकीय जीवनात पराजय असा ठाऊक नव्हता. ते भारतीय स्वातंत्र्याच्या समरात उतरले, भारत स्वतंत्र झालेला पाहिला गोवामुक्तीच्या लढयात उतरले, गोवा मुक्त झाला. त्यामध्ये एकाधिकारशाहीचा अंत झाला त्यांनी जीवनात ज्यासाठी लढा दिला तो सिध्दीस गेला होता. ही काही केवळ आत्मसंतुष्टात नाही. लढयाच्या यशस्वीतेचा विचार मनात पक्का असल्याचे हे लक्षण आहे. त्यांनी आपल्या जीवनात सामुदायिक

यशाला महत्त्व दिले.

ज्या लोकशाही समाजवादाच्या पायावर ना. ग. गोरेंची मनस्वी निष्ठा होती. ते तत्त्वज्ञानाच सामुदायिक श्रीमंती होत. राजकारणाने त्यांच्या जीवनावर आक्रमण करून त्यांच्या साहित्यनिर्मितीत अडथळा आणला असंही अनेकदा म्हटलं जातं. पण एक सौंदर्य प्रेमी कलावंत आणि राजकारणाच्या लढयात उडी घेतलला सैनिक हे दोन्ही घटक त्यांच्या व्यक्तिमत्वात नांदत होते. स्वातंत्र्याच्या चळवळीत ते सूर मारल्यासारखे पडले. आजन्म याना त्या संघर्षात राहिले. सार्वजनिक जीवनातल्या नव्या जबाबदाऱ्या पेलल्या त्यातून त्यांना कसलाही वैयक्तिक लाभ मिळाला नाही. ते सदैव ''लोकशाही समाजवादाच्या '' ध्यासाने जगत होते. ५

ना. ग. गोरे यांनी महाराष्ट्राच्या सामाजिक व राजकीय घडणीवर ठसा उमटविला. विदयार्थी दशेत असतानाच ते राजकारणात उतरले. स्वातंत्र्यलढयात तरूणांना सहभागी करून घेण्यासाठी अभ्यास मंडळात त्यांनी बौध्दिके घेऊन त्यांचे प्रबोधन केले. कम्युनिस्टांचे हुकूमशाही तत्त्वज्ञान आणि समाजवाद्यांची लोकशाही समाजवादावरील निष्ठा यातील मूलभूत वैचारिक फरक त्यांनी तरूणांना समाजावून सांगितला. ना. ग. गोरे हे कर्ते समाजसुधारक होते. त्यांनी आपल्या तत्वांशी कधीच तडजोड केली नाही. ६

१९३२ च्या कारावासात नाशिकच्या तुरूंगात असताना ना. ग. गोरेंनी भरपूर वाचन केले. येथेच असताना ते आणि त्यांचे सहकारी समाजवादी विचांराकडे आकृष्ट झाले. लोकांपर्यत समाजवादी विचार पोहचावेत म्हणून त्यांनी प्रयत्न केले. राष्ट्रसेवा दलाच्या शिबीरात किंवा अभ्यासवर्गात बौध्दिके घेण्याचे त्यांनी काम केले. ना. ग. गोरेंच्या बौध्दिकांमध्ये तर्कनिष्ठ विचार असत. त्यावेळच्या तरूणांना

लोकशाहीनिष्ठ समाजवादी बनविण्याचे फार मोठे श्रेय ना. ग. गोरेंना जाते. त्याकाळी लोकशाही समाजवाद आणि समाजवादी लोकशाही हा वाद चालत असे. या दोन शब्दांचा नवागतांना यथार्थ अर्थबोध ना. ग. गोरेंनीच करून दिला. ना. ग. गोरे तर्कनिष्ठ विचारवंत होतेच. त्याबरोबर त्याला कृतिनिष्ठेचीही धार होती. तरूणांनी अरसिक, पढीक, कर्मठ, पक्षनिष्ठ बनू नये असा त्यांचा कटाक्ष होता.

पार्टीच्या अधिवेशनातील प्रमुख राजकीय ठरावाचे मसुदे ना. ग. गोरे लिहित. सर्वांचे विचार ऐकून पक्षाच्या ध्येय धोरणानुसार सर्वसमावेशक ठरावाचे मसुदे तयार करत असत. तर्कनिष्ठ विचार, राजकीय विचारांची सुस्पष्टता, रोखठोक मांडणी यांची सांगड त्यांच्या लिखाणात असे. समाजवादी राज्यकर्त्यांमध्ये सतत वैचारिक गोंधळ निर्माण होत असे. स्वांतत्र्यानंतर राज्यकर्ता असलेला काँग्रेस पक्ष घोषणाबाजीने जनतेशी सतत फसवणूक करीत आलेला आहे. फोडा आणि जोडा या विदेश नितीचा काँग्रेस पक्षाने अनेक वेळा प्रयोग केला. त्यामानाने विरोधी पक्ष म्हणून समाजवादी कमी पडले. कॉग्रेस समाजवादी पुढाऱ्यांनी विरोधी पक्ष म्हणून घ्यावयाच्या प्रखर भूमिकेचा विचार केला नाही. त्याला ना. ग. गोरेही अपवाद नाहीत. ७

महाराष्ट्रात जवळ जवळ अर्धे शतक एस. एम. जोशी व ना. ग. गोरे हे समाजवादी मित्र एकत्र कार्य करत होते. प्रत्येक आंदोलनात ते खांदयाला खांदा लावून उभे राहिले. पण समाजवादी पक्षात फूट पडली आणि 'प्रजासमाजवादी' व 'संयुक्त समाजवादी' अशी त्याची दोन छकले पडली, त्यावेळी ना. ग. गोरे प्रजासमाजवादी पक्षात तर एसेम संयुक्त समाजवादी पक्षात अशी त्यांची विभागणी झाली. ८

वाराणसीला समाजवादी पक्ष फुटू नये म्हणून सर्व अन्याय विसरून व सतत तीन दिवस प्रयत्न करून ही दोन्ही बाजूंच्या प्रमुख नेत्यांनी आत्यंतिक टोकाची भूमिका घेतल्यामुळे काही जमू शकले नाही, त्यामुळे ना. ग. गोरे विषण्ण झाले. पक्ष फुटू नये, प्रभावी विरोधी पक्ष उभा रहावा म्हणून अखेरपर्यंत प्रयत्नांची पराकाष्ठा करून त्यांना यश आले नाही. या अपयशाने ना. ग. गोरे अत्यंत खिन्न झाले. बडोदे अधिवेशनाच्या काळात अनेक नेते काँग्रेसमध्येच दाखल व्हावे या मताचे असल्यामुळे 'अर्थपूर्ण संवादाच्या' निमित्ताने लोकशाहीच्या रक्षणासाठी आवश्यक असलेला विरोधी पक्ष एकजिनसी ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न होता. त्यासाठी सर्व टीका सहन करून ती भूमिका घ्यावी लागली होती. अन्यायाच्या परिमार्जनार्थ सीमा भागातील जनतेने महाराष्ट्र एकीकरण समितीच्या उमेदवारांना निवडून देऊन - मिळविलेला कौल याचाही परिणाम म्हणून एकदा सर्वांना मिळून निकराने प्रयत्न करावेत. आणि या प्रश्नांची कायम्ची तड लावावी असाही विचार त्यामागे होता. ९

'संयुक्त समाजवादी पक्ष' व 'प्रजासमाजवादी पक्ष' यांच्या विभागणीचा काळ कार्यकर्त्यांप्रमाणेच एसेम व ना. ग. गोरे यांना मनस्ताप देणारा ठरला. पण राजकीय परिस्थतीमुळे दोन स्वतंत्र पक्षांची चैनबाजी समाजवादी आंदोलनाला परवडणारी नाही. त्यामुळे दोघांचीही पिछेहाट होईल, हे दोन्ही पक्षांच्या नेत्यांच्या लक्षात आले व दुभंगलेले हे दोन पक्ष पुन्हा एकत्र आले. एसेम व ना. ग. गोरे हे शेवटपर्यंत जनता पक्षातच राहिले व अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही त्या पक्षाला ते सावरून धरीत राहिले. नंतरचे राजकीय वातावरण अतिशय विषण्ण बनविणारे झाले. जी मूल्ये त्यांनी उराशी बाळगली आणि ज्यासाठी स्वातंत्र्यलढयात आणि समाजवादी आंदोलनात भाग घेतला ती मूल्ये पायदळी तुडविली जात आहेत हे पाहून त्यांचे मन निराश झाले. पण अशाही निराशामय परिस्थितीत तरूणांच्या कर्तृत्वावर भिस्त ठेवून

ते समाजासाठी उत्साहाने काम करत होते. समाजवाद म्हणजे आर्थिक सामाजिक समता प्रस्थापित करणे होय हे उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून समाजवादी समाजरचना निर्माण करण्यासाठी ना. ग. गोरेंनी आयुष्यभर अथक प्रयत्न केले. समाजातील दारिद्रय आणि विषमता यांचे निर्मूलन समाजवादी समाजरचनेमुळेच होईल असे त्यांना वाटत होते. समाजवादी समाजरचना हे ध्येय डोळयासमोर ठेवून त्यांनी आपली राजकीय वाटचाल चालू ठेवली. १०

जयप्रकाश नारायण यांनी भ्रष्टाचार विरोधी आंदोलन उभारले तेव्हा हे आंदोलन दडपून टाकण्यासाठी इंदिरा गांधीनी आणीबाणी जाहीर केली. ना. ग. गोरेंनी खंबीरपणे आणीबाणीच्या विरोधात भूमिका घेतली. ना. ग. गोरेंनी यावेळी विरोधी पक्षाचे खासदार म्हणून संसदेत आणीबाणी ही लोकशाही नष्ट करणारी आहे असे स्पष्टपणे मांडून इंदिरा गांधींच्या धोरणावर कठोर टीका केली. त्या परिस्थितीत आणीबाणीचा धोका काय आहे हे सांगण्यासाठी त्या काळात लादलेले सारे काळे कायदे झुगारून देऊन ना. ग. गोरे विचार आणी उच्चारस्वातंत्र्याच्या प्रचारासाठी गावोगाव हिंडत होते. भारतातील लोकशाहीवर आघात करणाऱ्या आणीबाणी विरूध्द लोकांना निर्भय बनविण्याचे कार्य त्यांनी केले. त्यावेळी त्यांची लोकशाहीवरील निष्ठा व्यक्त होते. ११

महाराष्ट्राची राजकीय व सामाजिक जडणघडण करणाऱ्यापैकी एक महत्त्वपूर्ण व आगळे व्यक्तिमत्व म्हणजे ना. ग. गोरे हे होय. जनता सरकारच्या राजवटीत ना. ग. गोरे भारताचे हायकमिशनर म्हणून इंग्लंडला गेले. त्याच्या राजकीय कारकीर्दिमुळे त्याच्यांवर ही महत्त्वाची जबाबदारी टाकली होती. ना. ग. गोरेंच्या कामाचा उरक, त्वरीत निर्णय घेण्याची क्षमता आणि कामाच्या गुंतागुंतीला आवश्यक असलेली

दांडगी स्मरणशक्ती यामुळे त्यांना हायकमिशनर हे पद मिळाले. त्यांच्याकडे एखादे कागदपत्र पाठवले तर ते त्वरीत पाहत. राजकारणातील प्रशासनात ते नेहमीच नीटनेटकेपणा दाखवत. हायकमिशनर असताना भारतीय मंडळी त्यांना भेटायला येत त्यांच्यामध्ये चर्चा चालत. भारतात घडणाऱ्या सर्व बऱ्यावाईट घटनांचे पडसादाची ते दखल घेत. ना. ग. गोरेंना दिलेली परराष्ट्रीय कामगिरी त्यांना मनापासून आवडली होती असे वाटत नव्हते. कारण आणीबाणी संपल्यानंतर जनता पक्ष बहुमताने अधिकारावर आला होता. त्यावेळी भारतात चांगली स्थित्यंतर होणार असे वाटत होते. अशावेळी पुरूषार्थाचे खरे क्षेत्र भारतात होते, बाहेर नव्हे. ब्रिटनबरोबर भारताचे संबंध सलोख्याचे होते. त्यामुळे तेथे एखाद्या अनुभवी मुत्सद्याची आवश्यकता नव्हती. उलट मजूर पक्षाचे सरकार सत्तेवर असल्यामुळे एक विशेष समजुतीचे वातावरण तेथे अस्तित्वात होते. त्यामुळे ना. ग. गोरेंच्या कर्तृत्वाला आव्हान ठरेल असे तेथील कामाचे स्वरूप नव्हते. एक पक्षशिस्त म्हणून त्यांनी ती कामगीरी स्वीकारली आणि जीव ओतून पूरी केली.

ना. ग. गोरे हायकमिशनर म्हणून लंडनमध्ये असले तरी त्यांचे कान सदैव भारताचा कानोसा घेत राहिले. खाजगी पत्रांतून, भारतीय वर्तमानपत्रांतून आणि लंडनला येणाऱ्या पाहुण्यांकडून देशातील सर्व घटना तपशीलवार कळाव्यात अशी त्यांची सारखीच धडपड चालू असे. विशेषतः जेंव्हा महाराष्ट्रातील जातीय उद्रेक दिल्लीतील सत्तास्पर्धा यांच्या बातम्या येत तेंव्हा ना. ग. गोरेंना अत्यंत अस्वस्थ वाटत असे. ना. ग. गोरेंची त्या काळात एक भारतभेट झाली. त्यांनी भारतात येऊन राजकीय घडामोडीत भाग घेतला. भाषणे दिली, ते सारे देशाच्या काही ज्वलंत प्रश्नाबाबत ते राजदूत म्हणून इंग्लंडला कार्यरत असले तरी भारतातील प्रश्नांचे विचारचक्र त्यांच्याभोवती सतत असे.१२

ना. ग. गोरेंनी आपली इंग्लंडमधील राजदूताची जबाबदारी अतिशय कार्यक्षमतेने पार पाडली. त्यांच्यामुळे भारतीयांचा एकमेकांशी संपर्क खूप वाढला. आपल्याच हाताने जनता पक्षाने आपले मंत्रिमंडळ मोडले हे कळताच क्षणाचाही विलंब न करता ना. ग. गोरे राजीनामा देऊन भारतात परतले. आपल्याला काही करता येईल असे त्यांना वाटले. पण त्याचा फारसा उपयोग झाला नाही.

ना. ग. गोरे सत्तेच्या मागे कधीच लागले नव्हते. प्रत्येक संघर्षात मात्र ते आघाडीवर होते. मग तो महागाईविरोधाचा, भूमिमुक्तीचा लढा असो की संयुक्त महाराष्ट्राचा, गोव्याचा लढा असो. पुणे शहराचे महापौरपद आणि दीड वर्ष इंग्लंडचे राजदूत होते. मंत्रिपदाची अपेक्षाही त्यांनी कधी केली नाही. त्यांना सत्तेची लालसा नव्हती. मात्र राजकारणाबाबतचे विचार विश्लेषण यांची खोली अनुभवामुळे वाढलेली होती. कार्यकर्त्यांना आवश्यक वाटेल तेंव्हा मार्गदर्शन करण्यास तयार असत. राजकीय यंत्रणेपासून काहीशी अलिप्तता आल्यानंतर ना. ग. गोरे सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात अधिक रस घेऊ लागले. त्यावेळी त्यांचा पिंड मुख्यत: राजकीय होता. पण त्यापासून ते बाजूला झाले आणि राजकारणाच्या वर अधिक विशाल क्षेत्रात अधिक वैचारिक संशोधनात ते वेळ देऊ लागले. १३

ना. ग. गोरे द्रष्टेही होते. चीनच्या आक्रमणापूर्वी काही महिने आधी त्यांनी, एक लेख लिहिला होता. 'वैऱ्याची रात्र आहे, जागा रहा !' या लेखात त्यांनी चीनच्या भावी आक्रमणाचा स्पष्ट इशारा दिला होता. भविष्य काळातील सावधानतेचा इशारा त्यांनी दिला होता. असा तर्क एक जागृत राजकीय नेताच बांधू शकतो. ना. ग. गोरेंची तत्वनिष्ठाही अनेक प्रसंगी प्रत्ययास आलेली आहे. होशिंगाबाद मतदारसंघातून लोकसभेसाठी ना. ग. गोरेंनी उभे रहावे, त्या मतदार संघात

बहुसंख्य मतदार आहेत ते आपल्याला निश्चितच मते देतील, त्यांची मते मिळविण्याचा आम्ही खात्रीपूर्वक प्रयत्न करू, असे तेथील कार्यकर्ते सांगत होते आणि आग्रह करीत होते. ना. ग. गोरेंनी त्या कार्यकर्त्यांना स्पष्टपणे सांगितले, जातीय भावनांना आवाहन करून व खतपाणी घालून मला लोकसभेत जायचे नाही. जनता पार्टी सत्तेवर आली त्या काळात ना. ग. गोरे खुर्चीच्या मागे लागले नाहीत. पंतप्रधान मुरारजीभाई देसाईंनी ना. ग. गोरेंना महत्वाचे खाते देऊन कॅबिनेट दर्जाचे मंत्री करावयास हवे होते, असे अनेक कार्यकर्त्यांना वाटत होते. तथापि त्यांची नियुक्ती ब्रिटनच्या उच्च आयुक्तपदी करण्यात आली. त्या अल्प काळात त्यांनी भारताची प्रतिमा ब्रिटनमध्ये सुधारण्याचा प्रयत्न केला. परदेशी वकिल किंवा उच्चआयुक्त कसा असावा याचा आदर्श त्यांनी घालून दिला आहे. काही नेत्यांच्या विवेकशून्यतेने जनता पक्ष फुटत आहे असे दिसताच समझोत्यासाठी ना. ग. गोरे लंडनहून धावून आले. ना. ग. गोरेंनी अविरत प्रयत्न करूनही अविश्वासाचा ठराव मंजूर झाला. सत्ता गेली, पक्ष फुटला. १४

पं. नेहरूंच्या नेतृत्वाखाली जे पायाभूत उद्योगधंदे उभारले गेले, त्यांच्यामुळेच भारताच्या औद्योगिक प्रगतीचा पाया घातला गेला आणि या औद्योगिक क्षेत्राच्या उभारणीमुळेच संरक्षण क्षेत्रात आपण सामर्थ्यवान झालो, असे ना. ग. गोरेंचे मत होते. पाकिस्तान व चीन या दोन शेजाऱ्यांचे आक्रमक पवित्रे लक्षात घेऊनच आपण आपली संरक्षण सिध्दता केली पाहिजे ही भूमिका ते मांडित. विज्ञाननिष्ठेचा आणि आधुनिकतेचा पाठपुरावा करतानाच, आपण पर्यावरणाच्या संरक्षणाबाबत जागरूक असले पाहिजे असे प्रतिपादन ते सतत करीत. मेधा पाटकर यांनी ज्या झुंजारपणे आणि नेटाने चळवळ चालविली त्याबद्दल ना. ग. गोरेंना फार कौतुक होते.

त्याचबरोबर धरणग्रस्तांच्या पुनर्वसनास पाठिंबा देतांना, मोठी धरणेच नकोत अशी भूमिका घेऊन चालणार नाही. आदिवासींना न्याय देतांना त्यांना आधुनिक जीवनाच्या प्रवाहात आणले पाहिजे असेही त्यांनी स्पष्टपणे लिहिले. अंधश्रध्दा निर्मूलनाच्या लढ्यात त्यांनी नरेंद्र दाभोलकरांना सतत पाठिंबा दिला. तसेच बाबा आढाव यांच्या प्रबोधन कार्याचे आणि समतेच्या स्थापनेसाठी चाललेल्या चळवळीचे त्यांनी आग्रहपूर्वक समर्थन केले. तसेच आपल्याकडील सार्वजनिक उद्योगधंदे तोट्यात चालत असतांना त्यांबद्दल पुरेशी जागरूकता समाजवादी चळवळीने दाखविली नाही हे त्यांनी मान्य केले. राममंदिर आणि बाबरी मशीद प्रकरणी कोर्टाने तातडीने निकाल द्यावा असे ना. ग. गोरेंना वाटत होते. ते ज्यावेळी शक्य दिसेना त्या वेळी या प्रकरणी बाबरी मशीद कमिटीने माघार घेतल्यास अयोध्येचा वाद संपेल आणि हिंदू मुस्लिम ऐक्याचे नवे पर्व निर्माण होऊ शकेल असे त्यांचे मत होते. या सर्व ज्वलंत प्रश्नांवर त्यांनी न्यायबुध्दीने प्रकाश टाकला.

ना. ग. गोरेंनी १९२७ पासून स्वातंत्र्य लढयात भाग घेतला, त्यावेळी स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सर्व प्रश्नांची सोडवणूक करता येईल असे त्यांना वाटत होते. पुढे त्यांनी मार्क्सचे साहित्य वाचल्यानंतर स्वातंत्र्यामध्ये आर्थिक समतेचा आशय हवा ही जाणीव त्यांच्या मध्ये तीव्रतेने निर्माण झाली आणि कॉंग्रेस समाजवादी पक्षाच्या स्थापनेत त्यांनी पुढाकार घेतला. त्यांच्या मते डॉ. आंबेडकर जर स्वातंत्र्यलढयात असते तर सामाजिक समतेशिवाय स्वांतत्र्याला अर्थ नाही या त्यांच्या मतास ना. ग. गोरेंसारख्या अनेकांचा जोराचा पाठिंबा मिळाला असता. त्यांना जातीयता मान्य नव्हती. सामाजिक समता असावी असे वाटत असले तरी स्वातंत्र्य लढयासच अग्रक्रम असला पाहिजे असे त्यांना वाटत होते. भारतातील समतेच्या लढयामध्ये आर्थिक विषमतेविरूद्ध करावयाच्या संघर्षाप्रमाणेच सामाजिक

विषमतेच्या निर्मूलनासाठी संघर्ष केला पाहिजे. हे त्यांना १९५२ नंतर तीव्रतेने वाटू लागले. डॉ. बाबासाहेबांच्या 'ॲनायहिलेशलन ऑफ कास्ट' या ग्रंथांच्या अभ्यासानंतर भारताच्या संदर्भात मार्क्सवादी विचार अपुरा आहे आणि जातिव्यवस्था राहिली तर समता येऊच शकणार नाही हे त्यांना मनोमन पटले. १९७२ नंतर हे मत ते अधिक आग्रहाने मांडू लागले. ना. ग. गोरेंच्या मते, दलितांना व अन्य मागास जमातींना शतकानुशतके ज्ञानापासून आपण वंचित ठेवले आणि त्यांना माणूस म्हणूनही वागविले नाही हा फार मोठा अन्याय होता. त्यामुळे आपण स्वत:चे आणि देशाचेही नुकसान करून घेतले. जातिव्यवस्थेमुळे हिंदू समाज कधी एकात्म होऊ शकला नाही आणि त्यामुळेच आपल्यावरील परकीय आक्रमणांना आपण एकजुटीने प्रतिकार करू शकलो नाही' भारतात हिंदू व मुस्लिम समाजात भांडणे होत राहिली तर आपली प्रगती होऊ शकणार नाही असे त्यांचे मत होते. ना. ग. गोरेंनी जातीयवादी भूमिकेला कडाडून विरोध केला त्यावेळी पांढरपेशा वर्गात त्यांच्याविरूध्द क्षोभ निर्माण झाला. परंतु ना. ग. गोरे यत्किंचित डगमगले नाहीत. ना. ग. गोरेंनी कॉलेजमध्ये असताना आगरकरांचे विचार वाचले ते त्यांना पटले त्यानुसार त्यांनी घरात प्रथम वडिलांच्या जुन्या आचारांना विरोध केला. पुढे अनेक चळवळीमध्ये आघाडीवर राहून लढताना त्यांना आपल्या समाजाची अधिकाधिक ओळख पटत गेली. समाजवादी चळवळीचे नेतृत्व करीत असताना आर्थिक समतेइतकेच सामाजिक समतेस महत्त्व आहे, भारतीय समाज प्रगतीशील होण्यासाठी जातीजातींतील उच्चनीच भाव नष्ट केला पाहिजे, यावर त्यांनी भर दिला. 'योग्य असेल ते बोलणार आणि शक्य असेल ते करणार' या बाण्यानेच ना. ग. गोरे हे अखेरपर्यंत जगले.

ना. ग. गोरेंनी आयुष्याच्या अखेरच्या दहा वर्षात प्रत्यक्ष राजकीय कार्यातील सहभाग कमी केला त्याचवेळी सामाजिक समतेच्या लढयासाठी त्यांनी आपल्या

आयुष्याची मशाल पुन्हा पेटवली. त्यांच्या लेखणीचे प्रखर रूप यावेळी प्रकट झाले. चातुर्वर्ण्य, जातिव्यवस्थेतील अन्याय, हिंदुत्ववादी राजकारण यावर प्रखर टीका केली. या काळात स्पष्ट आणि सडेतोड मतप्रदर्शन करताना ना. ग. गोरेंनी सर्व तऱ्हेची अप्रियता निर्भयतेने सोसली आणि समाजासमोर कणखर पुरोगामी भूमिका मांडली. सामाजिक समतेसाठी आपल्या सर्व शक्ती त्यांनी या काळात पणास लावल्या. १५

ना. ग. गोरे ४२ च्या चळवळीतून मुक्त होण्यापूर्वी व नंतरही राजकीय, सामाजिक, कामगार युवक, शेतकरी या सर्व आघाड्यांवर नेतृत्व व मार्गदर्शन करत होते. स्वांतत्र्यपूर्व काळात काँग्रेस समाजवादी पक्षाच्या संस्थानी शाखेचे ना. ग. गोरे प्रतिनिधित्व करीत होते. ४२ चा लढा सुरू होईपर्यंत कोल्हापूर संस्थानी प्रजापरिषदेच्या ज्या ज्या चळवळी झाल्या त्या सर्व चळवळींशी त्यांनी कृतिशील संबंध ठेवला. प्रजापरिषदेच्या चळवळीच्या काळात ना. ग. गोरे पत्रकार म्हणून कोल्हापूरला जात असत. त्यामुळे त्यांचा संस्थानात प्रवेश सुलभ होत असे. संस्थाने खालसा होण्यापूर्वी त्यांनी हैद्राबाद मुक्ती लढयात भाग घेतला तेव्हा त्यांना तरूंगात एकांतात राहावे लागले. या ''कारागृहातील आठवणी'' पुस्तकाच्या रूपाने प्रसिध्द झाल्या. या पुस्तकाच्या आधारे राजकीय कार्यकत्यांना एकमार्गी न राहता अनेकमार्गी बनण्याचा त्यांनी संदेश दिला. कोल्हापूर संस्थान विलीन झाले आणि विधानसभेत व परिषदेत जी जी संस्थाने विलीन झाली होती. त्यांचे प्रतिनिधीत्व काँग्रेस सरकारने नेमून घेतले ही गोष्ट लोकशाहीविरोधी असल्याने ना. ग. गोरेंनी दक्षिणेत असलेल्या संस्थानांचा दौरा केला आणि ''ना प्रतिनिधी ना कर'' ही चळवळ हाती घेऊन, या भागातील ५१ सत्याग्रहींना घेऊन पुणे येथे त्यांनी सत्याग्रह केला. या सत्याग्रहात त्यांना व त्यांच्या सहकाऱ्यांना एक महिना सक्तमजुरीची

शिक्षा भोगण्यासाठी येरवडयात रवाना केले गेले. या बंदिकाळात सर्व सत्याग्रही एकाच बरॅकीत ठेवले होते. ना. ग. गोरेंनी या काळात एक महिन्याचे शिबीर घेतले त्यांनी सत्याग्रहींना अहिंसात्मक लढयाचे शिक्षण दिले. त्यावेळी ना. ग. गोरेंनी गांधीजींच्या सत्याग्रह तत्त्वाचा अवलंब केला.

अशाप्रकारे जेथे अन्याय झाला. तेथे ना. ग. गोरेंनी तो अन्याय सत्याग्रहाच्या अहिंसात्मक मार्गाने मोडून काढण्याचा प्रयत्न केला. संस्थानी प्रजेला गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी हैद्राबादच्या लढयात ना. ग. गोरेंनी भाग घेतला. तसेच परकीय दास्यातून मुक्त होण्याकरिता लोहियांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेले गोवा आंदोलन जेव्हा नॅशनल काँग्रेस गोवाच्या नेतृत्वाखाली पुढे सरकत नाही. हे त्यांच्या नजरेस आले तेव्हा त्यांनी पक्ष प्रांतिक कार्यकारणीपुढे गोवा सत्याग्रहाची कल्पना मांडली आणि गोवामुक्तीसाठी त्यांनी सत्याग्रह केला. या सत्याग्रहानंतर ते अटकेत गेले. पण पुढे भारतभर सत्याग्रहाचे लोण पसरले आणि सत्याग्रहाची परिणती गोवामुक्तीत झाली.

गोव्याच्या बंधमुक्तीमुळे ना. ग. गोरे बाहेर आले पण समाजवादी पक्षाच्या नेतृत्वात सर्वच आघाड्यांवर एकमुखी वैचारिक नेतृत्व राहिले नाही. गोवा व संयुक्त महाराष्ट्र या चळवळीतून संयुक्त आघाडीच्या धर्तीवर काम चालू राहिले. प्रत्येक पक्ष आपल्या पक्षाची बळकटी कशी वाढेल याचा प्रयत्न करत होता, त्यामुळे राजकीय आघाडीवर रस्सीखेचचा खेळ सुरू झाला होता. या सर्व घडामोडींचा परिणाम पक्ष नेतृत्वावर झाल्याचे दिसून येते. त्यामुळे संयुक्त समाजवादी पक्ष, प्रजासमाजवादी पक्ष हे दोन पक्ष समाजवादी आघाडीवर निर्माण झाले. या सर्व घडामोडीत ना. ग. गोरेंची भूमिका ही काँग्रेस समाजवादी पक्ष, समाजवादी पक्ष, प्रजासमाजवादी पक्ष

व संयुक्त समाजवादी पक्ष आणि शेवटी प्रजा सोशलिस्ट पार्टी या सर्व वाटचालीत सातत्य टिकावणारी होती.

पक्षाच्या कामात स्त्रियांनी भाग घ्यावा इतकेच नाही तर पुढाकार घ्यावा, या हेतूने प्रांताच्या पक्षकार्यकारिणीवर स्त्रियांचा समावेश करण्याचा आग्रह ना. ग. गोरेंनी धरला. प्रांत-कमिटीवर त्या कशा प्रकारे निवडून येतील याकडे लक्ष दिले. व ज्यांची निवड प्रांतकार्यकारिणीवर झाली त्यांना थोडा कामाचा अनुभव येताच अखिल भारतीय पक्षकार्यकारिणीवर त्यांची कशी निवड होईल याकडे लक्ष दिले. स्त्री कार्यकर्त्यांमार्फत समाजवादी महिला सभेचे संघटन उभे करण्यात आले. त्यामार्फत स्त्रियांना देश स्तरावरून - जागतिक संघटनांच्या पातळीवर संधी उपलब्ध करून दिली. समाजाच्या दृष्टीने क्षुल्लक असल्या तरी त्या समाजधारणेसाठी आवश्यक असणाऱ्या बारीकसारिक गोष्टींचा त्यांनी साकल्याने विचार केलेला आढळून येतो.१६

ना. ग. गोरे एका सनातनी विचांराच्या कुटुंबात जन्माला येऊनही ते अगदी तारूण्यातच पूर्णपणे पुरोगामी, विज्ञानवादी बनले होते. समता न्याय, अन्यायाविरूध्द संघर्ष आणि पक्की विज्ञान निष्ठा यावर त्यांची वैचारिक बैठक आधारलेली होती. समाजवादी महाराष्ट्राची उभारणी करणारे त्यांच्या विचारांनी तीन पिढया घडल्या अन्यायाविरूद्‌ध संघर्षाच्या लढयात ना. ग. गोरे प्रत्येक वेळी उतरले.

ना. ग. गोरे विज्ञाननिष्ठ होते. स्वातंत्र्याचा लढा असो, जातिधर्मवादाचा मानवतेचा प्रश्न असो किंवा स्त्री-पुरूष समतेचा प्रश्न असो, ना. ग. गोरेंनी योग्य अशीच भूमिका प्रत्येक वेळी घेतली होती. अयोध्या प्रश्नाच्या वेळी ना. ग. गोरेंनी केलेली परखड भाषणे ऐकूण जातिवादी संघटना संतापल्या होत्या. त्यावेळी त्यांनी गोरेंवर आरोप केले पण कुठल्याही प्रकारे आपल्या तत्वांशी, विचारांशी तडजोड न करता ना. ग. गोरेंनी या सर्व विरोधाला तोंड दिले.

स्त्री - पुरूष समतेबाबत ना. ग. गोरेंचे विचार अर्थातच समता, मानवता व विज्ञानाला धरूनच होते. राजकारण की समाजकारण हा प्रश्न त्यांच्या पुढे येण्याचे कारणच नव्हते. राजकारण हे त्यांनी जीवनात पत्करलेच होते. त्यात गांधीजी आणि मार्क्स हे त्यांना गुरूस्थानी होते. पण त्या काळात एका तरूण विधवेशी लग्न करण्याचा निर्णय त्यांनी घेतला तेव्हा त्यांच्यावर गांधीजींप्रमाणे महर्षी कर्व्यांच्या व आगरकरांच्या विचारांचा, कार्यांचाही प्रभाव होता.१७

ना. ग. गोरे हे तरूण कार्यकर्त्यांचे प्रेरणास्थान होते. त्यांनी आपल्या जीवनात देशाकरिता आणि समाजाकरिता जे कार्य केले, तो आदर्श कार्यकर्त्यांना समोर ठेवला. सिमा चळवळीमध्ये त्यांचे अखंड मार्गदर्शन कार्यकर्त्यांना मिळाले होते. बेळगावमध्ये भाषण करताना ना. ग. गोरेंनी आत्मविश्वासाने सीमाभागातील लाखो मराठी भाषिकांना एक संदेश दिला. त्यांच्या मते ते भारतीय स्वातंत्र्यासाठी लढले आणि अखेर भारत स्वतंत्र झाला. हैद्राबाद मुक्तीसाठी ते निजामाशी लढले आणि आणि हैद्राबाद मुक्त झाले. साडेचारशे वर्ष पोर्तुगीजांच्या गुलामगिरीत जखडलेल्या गोमंतकासाठी त्यांनी आंदोलन छेडले आणि गोमंतक देखील पोर्तुगीजांच्या जोखडातून मुक्त झाला. संयुक्त महाराष्ट्रासाठी ते झगडले आणि बऱ्याच अर्थी संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाला. महाराष्ट्राचा असलेला बेळगाव सीमाभाग त्यावेळी अन्यायाखाली कर्नाटकात खितपत होता. त्याच्या मुक्तीसाठी ते वर्षानुवर्षे लढत होते. हा सीमालढा देखील जिंकून दाखवू. आज ना उदया या मराठी भाषिकांना न्याय देणे सरकारला भाग पडेल असा संदेश त्यांनी बेळगाव वासीयांना दिला. ना. ग. गोरेंच्या त्यावेळच्या प्रेरणादायी भाषणाने सीमावासीयांचे मनोधैर्य वाढले आणि सीमाप्रश्नाच्या सोडवणूकीसाठी शेवटपर्यंत लढण्याचा सीमावासीयांनी निर्धार केला. कार्यकर्त्यांचे मनोबल वाढविणे, त्यांच्या मनातील ध्येयवादाला फुंकर घालणे त्याला सतत धीर

देणे हे तर ना. ग. गोरेंचे खास वैशिष्टय होते. विशेषत: एसेम जोशी गेल्याने संयुक्त महाराष्ट्र सीमा समितीचे कार्य थांबणार अशी विरोधकांची अटकळ होती. पण ना. ग. गोरेंनी या समितीची धुरा आपल्या खांदयावर घेऊन सीमाभागातील मराठी जनतेला नेत्याविना पोरके होऊ दिले नाही.

सीमा प्रश्नासाठी सत्याग्रह असो, उपोषणादि कार्यक्रम असोत दिल्ली मोर्चा असो किंवा कोणतीही निवडणूक असो, ना. ग. गोरे सदैव महाराष्ट्र एकीकरण समितीच्या पाठीशी राहिले त्यांनी सीमा चळवळीला एक प्रतिष्ठा मिळवून दिली. पं. जवाहरलाल नेहरू यांच्यापासून त्यावेळचे विद्यमान पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांच्यापर्यंत सर्व पंतप्रधानांशी चर्चा करून हा सीमाप्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी आग्रही मागणी केली. कोणत्याही परिस्थितीत मराठी सीमाभागावरील अन्याय दूर होईपर्यंत सर्वांनी आपला पक्षीय दृष्टीकोन बाजूला ठेवून सीमावासीयांवरील अन्याय दूर केला पाहिजे ही त्यांची ठाम भूमिका होती. त्यांच्या मते, आपण तत्त्वाची आणि माणुसकीची फारकत करू शकत नाही. एखादया व्यक्तीवर किंवा समूहावर अन्याय झाला असेल तर तो आपण पाहू शकत नाही. उलट प्रत्येक समाजवाद्याने आणि मानवतावाद्याने शासनाकडून होत असलेला अन्याय दूर करून घेण्यासाठी आपल्या प्राणाची बाजो लावली पाहिजे. असा ना. ग. गोरे उपदेश करीत. त्यांच्या मते, आपल्याच स्वतंत्र देशात एका भाषिक सत्ताधिशांकडून दुसऱ्या भाषेच्या बांधवांवर अन्याय होतो आणि त्या बांधवांना अमानुष छळ सहन करावा लागतो त्या विरूद्ध बुध्दिप्रामाण्यवादयांनी मानवतावाद्यांनी आणि समाजवादयांनी लढले पाहिजे.

ना. ग. गोरे हे वरकरणी मृदू आणि नेमस्तपंथी वाटत असले तरी एखाद्या ध्येयवादी आंदोलनाच्या दृष्टीने जहाल होते. ते क्रांतीकारी विचारांचे होते याचा

अनुभव सीमावासीयांना आला होता. त्यांचे मार्गदर्शन आणि उत्तेजन कार्यकर्त्यांना सतत जाणवत होते. नीतीमूल्यांचा आधार देऊन सीमालढ्यामध्ये त्यांनी जे योगदान दिले ते सीमावासी कधीही विसरणार नाहीत. १८

१९८० नंतर ना. ग. गोरे यांनी जे वैचारिक लेखन केले, त्यामध्ये त्यांनी भारतीय जीवनाच्या संदर्भात सामाजिक समतेला अग्रस्थान दयावे लागेल हा विचार परखडपणे मांडला आहे. महात्मा फुले, आगरकर आणि डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचे समर्थन ना. ग. गोरेंनी आग्रहाने केले. समाजवादी विचारांना सामाजिक समतेचे अधिष्ठान असलेच पाहिजे अशी भूमिका स्पष्टपणे मांडली. त्यांनी त्यांच्या विचारांना कधीही मुरड घातली नाही.

राजकारणातील नैतिकता या विषयी ना. ग. गोरेंनी विचार मांडले त्यांच्या मते, नैतिकता म्हणजे एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राला गुलाम न बनविणे. एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राचे स्वातंत्र्य नष्ट करून त्या राष्ट्राला गुलाम करणे हे अनैतिक आहे. लोकमान्य टिळकांनी म्हटल्याप्रमाणे स्वराज्य हा प्रत्येक व्यक्तीचा, राष्ट्राचा जन्मसिध्द हक्क आहे. या अर्थाने आपला स्वातंत्र्यसंग्राम हा नैतिक भूमिकेवर अधिष्ठित होता. त्याचप्रमाणे धनिकांच्या वर्गाने, भांडवलदारांनी आणि जमीनदारांनी कामगारांचे आणि शेतकऱ्यांचे शोषण करणे, त्यांच्या श्रमांचे योग्य मूल्य त्यांना न देणे हे अनैतिक आहे. समाजवादी विचार हा अशा श्रमिकांच्या आर्थिक शोषणाला, पिळवणुकीला विरोध करणारा आहे आणि समाजवादी चळवळ या नैतिक विचारावर आधारलेली आहे. भारतामध्ये म. फुले, महर्षी शिंदे, डॉ. आंबेडकर आदींनी सामाजिक विषमतेविरूध्द जो लढा दिला, त्यालाही असेच नैतिक अधिष्ठान आहे. आपल्याकडील जातिव्यवस्था ही अन्याय करणारी आहे. जन्मावर आधारलेली उच्चनीच जातींची व्यवस्था ही सर्वस्वी अनैतिक आहे. उच्च जातींनी दलितांना ज्ञानाचे दरवाजे बंद

केले. सर्व बाबतीत हीन लेखून त्यांना अमानुष रीतीने वागविले बहुजन समाजाच्या श्रमिकांना शेतकऱ्यांनाही उच्च जातींनी तुच्छ लेखले हे सर्व अनैतिकच होते. म्हणूनच सामाजिक समतेसाठी केलेला संघर्ष हा नैतिकतेवर आधारलेली चळवळ होती.

स्त्री-मुक्ती आंदोलनाचे स्वरूपही असेच नैतिक आहे. स्त्रियांचे शोषण, त्यांच्यावरील अन्याय दूर झाले पाहिजेत. स्त्रियांना आणि पुरूषांना समान हक्क असणे सामाजिक न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे ही समानता प्रस्थापित करण्यासाठी चाललेल्या स्त्री-मुक्तीच्या चळवळीचें स्वरूप नैतिकच आहे. ना. ग. गोरेंच्या मते, प्रत्येक माणसाच्या अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा ज्याप्रमाणे भागल्या पाहिजेत त्याचप्रमाणे त्यांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी त्याला शिक्षणाची संधी मिळालीच पाहिजे. इतकेच नव्हे तर ज्या दलितांना आणि अन्य मागासवर्गीयांना ज्ञानापासून वंचित ठेवले गेले त्यांना शिक्षणासाठी जादा संधी दिली पाहिजे. सामाजिक न्याय हाच नैतिकतेचा आशय आहे असे ना. ग. गोरेंना वाटत होते. ना. ग. गोरेंनी राजकीय नैतिकता सामाजिक न्याय प्रस्थापित होणे आवश्यक आहे असे सांगितले व सामाजिक न्याय निर्माण होण्याच्या दिशेने प्रयत्न केले. १९

ना. ग. गोरेंनी राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात महत्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांनी त्यांच्या जीवनात राजकारणाला मोठे स्थान दिले. परंतु त्यांचे राजकारण सत्तेसाठी कधीच नव्हते. ना. ग. गोरेंच्या जीवनात उक्ती आणि कृती यांचा सुरेख संगम असे त्यांनी त्यांच्या जीवनात भावनांपेक्षा विचारांना आणि विचाराहून कृतीला अधिक महत्त्व दिले. आपण समाजाची बांधिलकी मानली पाहिजे. ना. ग. गोरेच्या राजकीय व्यक्तिमत्वाच्या मागे साहित्यिक, वैचारिक व्यक्तितत्व होते. त्यांनी आपले सर्व आयुष्य शोषित, दलित, मजूर, शेतकरी, कष्टकरी यांना आर्थिक, सामाजिक, राजकीय न्याय मिळावा यासाठी खर्च केले. भारतीय स्वातंत्र्याचा लढा असो, की

संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, गोवा मुक्ती, महाराष्ट्र-कर्नाटक सिमा प्रश्न यात त्यांनी हिरीरिने भाग घेतला. आणि संपन्न सुसंस्कृत, आर्थिक, सामाजिक, राजकीय समतेवर आधारित महाराष्ट्राची उभारणी करण्यासाठी प्रयत्न केले.

# संदर्भसूची


| | | | |
|---|---|---|---|
| १) | दंडवते मंधू | - | 'नानासाहेबांची राजकीय वाटचाल' गोरे गौरव संपा. सदानंद वर्दे श्री. पु. भागवत मौज प्रकाशन, मुंबई पृ. क्र. १९, २१, २२, २३ |
| २) | प्रधान ग. प्र. | - | 'महाराष्ट्राचे शिल्पकार - ना. ग. गोरे' प्रथमावृत्ती १ मे २००६ प्रकाशन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई पृ. क्र. ११, १२, १९, ३५ |
| ३) | देशपांडे पु. ल. | - | 'प्रफुल्ल होवोनि सपुष्प ठेले' गोरे गौरव संपा- सदानंद वर्दे श्री. पु. भागवत मौज प्रकाशन, मुंबई पृ, क्र. ११, १२, १३ |
| ४) | गोरे ना. ग. | - | 'आव्हान आणि आवाहन' प्रथमावृत्ति १ ऑगस्ट १९६३ साधना प्रकाशन, पुणे पृ. क्र. ६८, ६९ |
| ५) | देशपांडे पु. ल. | - | 'प्रफुल्ल होवोनि सपुष्प ठेले' गोरे गौरव संपा सदानंद वर्दे श्री. पु. भागवत मौज प्रकाशन, मुंबई पृ.क्र. १५,१६,१८ |
| ६) | लिमये माधव | - | 'चतुरस्त्र व्यक्तिमत्व' गोरे गौरव संपा-संदानंद वर्दे श्री. पु. भागवत मौज प्रकाशन, मुंबई पृ. क्र ५७, ५८ |
| ७) | तावडे नारायण | - | 'नारायणाच्या शब्दांत नारायण' गोरे गौरव संपा -संदानंद वर्दे |

श्री. पु. भागवत मौज प्रकाशन, मुंबई
पृ. क्र. ७३

८) लिमये माधव - 'चतुरस्त्र व्यक्तिमत्व'
गोरे गौरव संपा - संदानंद वर्दे
श्री. पु. भागवत मौज प्रकाशन, मुंबई
पृ. क्र. ६०

९) तावडे नारायण - 'नारायणाच्या शब्दात नारायण'
गोरे गौरव संपा सदानंद वर्दे
श्री. पु. भागवत मौज प्रकाशन, मुंबई
पृ. क्र. ७८

१०) लिमये माधव - 'चतुरस्त्र व्यक्तिमत्व'
गोरे गौरव संपा-सदानंद वर्दे
श्री. पु. भागवत मौज प्रकाशन, मुंबई
पृ. क्र. ६०

११) प्रधान ग. प्र. - 'महाराष्ट्राचे शिल्पकार - ना. ग. गोरे'
प्रथमावृत्ती १ मे २००६ प्रकाशन -
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती
मंडळ, मुंबई पृ. क्र. ६०

१२) वैदय विठ्ठभाऊ - 'भारताचे हायकमिशनर'
गोरे गौरव संपा-सदानंद वर्दे
श्री. पु. भागवत मौज प्रकाशन, मुंबई
पृ. क्र . २९, ३०, ३१, ३२, ३५

१३) लिमये अनसूया - 'निष्ठेचे नेतृत्व'
गोरे गौरव संपा - सदानंद वर्दे
श्री. पु. भागवत मौज प्रकाशन, मुंबई
पृ. क्र. ४४

१४) तावडे नारायण - 'नारायणाच्या शब्दांत नारायण' गोरे गौरव संपा - संदानंद वर्दे श्री. पु. भागवत मौज प्रकाशन, मुंबई पृ. क्र. ७८

१५) प्रधान ग. प्र. - 'नानासाहेब गोरे - एक समर्पित जीवन' ना. ग. गोरे प्रथम स्मृतिदिन अंक १ मे १९९४ प्रकाशन साधना प्रेस, पुणे पृ. क्र. १०,११

१६) शिंदे दत्ता - 'तीर्थस्वरूप' गोरे गौरव संपा - सदानंद वर्द श्री. पु. भागवत मौज प्रकाशन, मुंबई पृ. क्र. ८१, ८२, ८३, ८४

१७) लिमये अनुताई - अज्ञानाविरूद्ध संघर्ष आणि विज्ञानावर निष्ठा' ना. ग. गोरे प्रथम स्मृतीदिन अंक १ मे १९९४ साधना प्रकाशन पुणे, पृ. क्र. २१

१८) ठाकूर किरण - 'नानासाहेब वरून नेमस्त वाटत असले तरी आंदोलनाच्या बाबतीत जहाल वृत्तीचे होते' ना. ग. गोरे प्रथम स्मृतीदिन अंक १ मे १९९४ साधना प्रकाशन पुणे, पृ. क्र. २७, २८

१९) प्रधान ग. प्र. - 'महाराष्ट्राचे शिल्पकार - ना. ग. गोरे' प्रथमावृत्ती १ मे २००६ प्रकाशन - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई पृ. क्र. ७७, ७८, ७९, ८०